# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४००००५
दूरध्वनी: ०२२-६९८७ ६६६६
ई–मेल: mercindia@merc.gov.in संकेत स्थळ: www.merc.gov.in

MERC

**Advertisement No. 03/2025**

## जाहीर सूचना

### सन २०२४ चे प्रकरण क्र. १४१ आणि सन २०२४ चे प्रकरण क्र. १४२
### मे. एसईझेड बायो-टेक सर्व्हिसेस प्रा. लि. यांनी त्यांच्या विशिष्ट अटी विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८ अंतर्गत केलेल्या अर्जावर अभिप्राय मागविण्याबाबत

१. मे. एसईझेड बायो–टेक सर्व्हिसेस प्रा. लि. **(एसईझेड बायोटेक)** यांनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने **(आयोग)** दि. २३ जुलै, २०२४ रोजी अधिसूचित केलेल्या मविनिआ (मे. एसईझेड बायो–टेकच्या मांजरी गाव, जिल्हा पुणे येथील पुनावाला बायोटेक्नॉलॉजी पार्कसाठी क्षेत्र–सापेक्ष विशेष आर्थिक क्षेत्राकरिता लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०२४ आणि मविनिआ (मे. एसईझेड बायो–टेकच्या हडपसर गाव, जिल्हा पुणे येथील जैव–तंत्रज्ञान आणि औषधनिर्माण क्षेत्राकरिता क्षेत्र–सापेक्ष एसईझेडसाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०२४ **(विशिष्ट अटी विनियम)** या विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी, मांजरी बुद्रुक आणि हडपसर गाव, जिल्हा पुणे येथील दोन्ही एसईझेडच्या सुधारीत क्षेत्रासह, आयोगाकडे अर्ज सादर केला आहे.

२. एसईझेड बायोटेकने, अधिनियमांच्या कलम १८(२)(ए) अंतर्गत आवश्यक असल्यानुसार लेखी सूचना किंवा हरकती मागविण्यासाठी (१) टाईम्स ऑफ इंडिया, पुणे आवृत्ती (इंग्रजी), (२) इंडियन एक्सप्रेस, पुणे आवृत्ती (इंग्रजी), (३) लोकसत्ता, पुणे आवृत्ती (मराठी) आणि (४) महाराष्ट्र टाईम्स, पुणे आवृत्ती (मराठी) या वृत्तपत्रांमध्ये दि. १९ डिसेंबर, २०२४ रोजी जाहीर सूचना प्रसिध्द केली होती. या सूचनेवर कोणत्याही हरकती/अभिप्राय प्राप्त झाल्या नाहीत.

३. एसईझेड बायोटेकने सादर केलेला अर्ज आणि अन्य कागदपत्रांचे मूल्यमापन केल्यानंतर, आयोगाची सकृतदर्शनी खात्री झाली आहे की, विद्युत अधिनियम, २००३ आणि विनियमांमध्ये आखून दिलेल्या आवश्यकतांचे पालन करण्याच्या अधीन राहून, एसईझेड बायोटेकच्या विशिष्ट अटी विनियमांमध्ये सुधारणा करता येईल.

४. एसईझेड बायोटेकच्या अर्जाच्या प्रती, त्यासोबतच्या परिशिष्ट आणि जोडपत्रांसह, आयोगाच्या www.merc.gov.in या संकेत–स्थळावरुन किंवा मविनिआ (कामकाजाचे नियम आणि शुल्क व आकार) (पहिली सुधारणा) विनियम, २०२४ मध्ये ठरवून देण्यात आलेल्या कार्यपध्दतीचे पालन करुन आयोगाच्या कार्यालयात कोणत्याही व्यक्तीला पाहता येतील.

५. प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीर सूचनेच्या संबंधात, इच्छुक व्यक्तिंना आयोगाच्या संकेत–स्थळावरील E-Public Consultation या टॅबद्वारे अपलोड करुन त्यांच्या सूचना/हरकती इंग्रजी किंवा मराठी भाषेमध्ये लेखी सादर करता येतील (www.merc.gov.in/e-public-consultation). या टॅबचा वापर करण्यात कोणतीही अडचण आल्यास, संबंधित व्यक्ती कामकाजाच्या दिवसांमध्ये सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या दरम्यान मोबाईल क्र. ८९२८०७१५२२ वर किंवा suggestions@merc.gov.in या ई–मेल आयडीवर संपर्क साधू शकतात.

६. ज्या व्यक्तीने आयोगाच्या E-Public Consultation या टॅबवर सूचना आणि हरकती दाखल केल्या असतील त्यास त्याच्या निवेदनाची छापील प्रत दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तीला इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करणे शक्य नाही त्यांनी त्यांच्या सूचना आणि हरकतींची छापील प्रत **सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांना १३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई– ४०० ००५** या पत्त्यावर, या सूचना आणि हरकतींची प्रत श्री निसार शेख, महाव्यवस्थापक, ७०९, ७वा मजला, टॉवर **२,** वर्ल्ड ट्रेड सेंटर, खराडी, पुणे – ४११०१४, (Email: nisar@eropower-in) यांना देण्यात आल्याच्या पुराव्यासह, पाठवावी आणि त्यावर पाठविणाऱ्याने आपले पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई–मेलचा पत्ता, असल्यास, कळवावा. **४ जुलै, २०२५ रोजी सायंकाळी ५.००** नंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि/किंवा हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत. अन्य कोणत्याही माध्यमाद्वारे दाखल करण्यात आलेल्या सूचना/हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

७. एसईझेड बायोटेक, ४ जुलै, २०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व हरकती/अभिप्रायांमधील प्रत्येक हरकती/अभिप्रायास त्या प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांच्या आत, परंतु ८ जुलै, २०२५ नंतर नाही, उत्तर पाठविल. एसईझेड बायोटेकने दिलेल्या उत्तरांवर हितसंबंधितांना त्यांची प्रत्युत्तरे ई–जन सुनावणी दरम्यान किंवा ११ जुलै, २०२५ पर्यंत सादर करता येतील.

८. वरील परिच्छेद (५) नुसार, अभिप्राय/हरकती पाठविणाऱ्या प्रेषक/आक्षेपकाला त्याचे म्हणणे जाहीर ई–सुनावणीमध्ये व्यक्तिशः आयोगासमोर मांडावयाचे असल्यास सूचना/हरकती दाखल करताना तसे विशेषत्वाने नमूद करावे. अशा प्रकरणी, वैध ई–मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक देणे अनिवार्य राहील. आयोग, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, अशा प्रेषक/आक्षेपकाला ई–सुनावणीमध्ये त्याचे म्हणणे मांडण्याची परवानगी देऊ शकेल. जाहीर ई– सुनावणीत भाग घेणाऱ्या सर्व व्यक्ती आयोगाने दि. १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी जारी केलेल्या याचिकेच्या ई–सुनावणीसाठी अनुसरावयाची परिचालनात्मक कार्यपध्दती आणि प्रोटोकॉलमधील कार्यप्रणाली निर्देशांचे पालन करतील.

९. शुक्रवार, दि. २५ जुलै, २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात यावयाच्या ई–जन सुनावणीमध्ये एसईझेड बायोटेकच्या विशिष्ट अटी विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठीचा अर्ज विचारात घेण्यात येईल. या प्रयोजनासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

दिनांक :– ४ जून, २०२५
ठिकाण : मुंबई

(डॉ. राजेंद्र गं. आंबेकर)
सचिव, मविनिआ